# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मौजा- सिताबर्डी, न.भू.क्र. २४२२, २४०८, २४१०, २४०९, २४०७, २४०६, २४०४, २४०३, २४०२ येथील जागेच्या भूसंपादनाकरीता नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत निधी मागणीचा प्रस्ताव

**{ नगर रचना विभाग }**

मौजा- सिताबर्डी रेल्वे स्टेशन लगत नागपूर - रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ विद्यमान २४.०० मी रूंद विकास रस्ता २५.०० मी. रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधेच्या विकासाकरीता भूसंपादन प्रकरणी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानातंर्गत निधी मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांच्यामार्फत पत्र क्र. मनपा/नरवि/२२७२, दि. ०९.०२.२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आलेल्या आहे. शासनास सादर करण्यात आलेला निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाअंतर्गत शासनाचा दि. ०४.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानूसार नमूद कार्यपध्दतीनूसार शासनास सादर करण्यात आलेला होता. तथापी, शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाची मुदत माहे ऑगष्ट २०२४ मध्ये संपत असल्याने या योजनेचे पुनरावलोकन करून राज्यातील वाढत्या नागरी भागाच्या गरजा विचारात घेऊन या योजनेअंतर्गत अ,ब व क वर्ग महापालिकांचा नव्याने समावेश करणे तसेच, योजनेच्या व्याप्तीमध्ये आणि वित्तीय आकृतीबंधात आवश्यक बदल करून ही योजना “नगरोत्थान महाभियान” या नावाने सूधारीत स्वरूपात राबविण्याकरीता शासनाने दि. २२.०२.२०२४ रोजी शासन निर्णय घेतलेला आहे. याकरीता शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधाच्या निर्मितीसाठी “नगरोत्थान महाभियान” योजना राबविण्यात शासन निर्णय घेतला असल्यामुळे सदर अभियानाअंतर्गत शासनास नागपूर रेल्वे स्टेशनजवळील रस्ता रूंदीकरण व तद्अनुषंगीक कामाकरीता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

याकरीता नगरोत्थान महाअभियांनाअंतर्गत शासनास निर्णयात नमूद कार्यपध्दतीनूसार विहीत मार्गाने शासनास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने दि. ०७.०२.२०२५ रोजीच्या पत्रानूसार विहीत मार्गाने प्राथाम्याने शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे. त्या दृष्टीने नागपूर रेल्वे स्टेशनजवळील रस्ता रूंदीकरण व तद्अनुषंगीक कामाकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

नागपूर शहरातील मौजा-सिताबर्डी येथील नागपूर –रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ रेल्वे स्टेशन लगत जयस्तंभ चौक ते मानस चौकापर्यंत विकास योजनेतील २४.०० मी रूंदीचा विकास योजना रस्त्याचे २५.०० मी रूंद करणेसह तद्नुषंगीक सुविधेचा विकास करणेचा प्रस्ताव असून सदर रस्ता राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ असून सदर रस्ता शहरातील मुख्य विकास योजना रस्ता आहे. सदर रस्ता रूंदीकरणामध्ये एकूण १२ शासकीय जागेचा समावेश असून या जागांमध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (MSRTC) व मध्यप्रदेश राज्य परिवहन महामंडळ (MPRTC) यांच्या मालकीच्या जागेंचा समावेश आहे. नगर भुमापन क्र. २४०३ ही जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या मालकीची असून सदर जागेचे क्षेत्र ४७६३.०० चौ.मी आहे. तसेच नगर भुमापन क्र. २४०४ नझुल/ मध्यप्रदेश राज्य परिवहन महामंडळ यांच्या मालकीची असून सदर जागेचे क्षेत्र

२७४०.२० चौ.मी आहे. सदर दोन्ही जागांचे संपादनाखालील क्षेत्र ७५०३.२० चौ.मी. एवढे आहे. सदर जागेचे संपादन नागपूर महानगरपालिकेस करावयाचे असल्याने सदर जागेचे संपादनकामी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून सुधारीत मुल्यनिर्धारण अपेक्षिले असता उक्त मालमत्ताच्या संपादनाकरीता नभुक्र.२४०३ या जागेचे मुल्यांकन रू. १९,४२,६४,७१६/- तसेच नभुक्र. २४०४ या जागेचे मुल्यांकन रू. ११,९०,७९,७२२/- असून दोन्ही जागांचे एकूण मुल्यांकन रू. ३१,३३,४४,४३८/- एवढे सुधारीत मुल्यनिर्धारण उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी नागपूर (शहर) यांनी नागपूर महानगरपालिकेस दि ३०.०१.२०२४ रोजी कळविलेले आहे. रेल्वे स्टेशनजवळील उड्डाणपुलाखालील विस्थापित होत असलेल्या गाळेधारकांनी मा. उच्च न्यायालयात रिटयाचिका क्र. ५६३३/२०२२ दाखल केली असता त्यामधील दि. १३.१२.२०२३ रोजी पारीत आदेशानूसार सदर विकास योजनेतील रस्ता रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधेच्या विकासाकरीता उक्त मालमत्ताच्या संपादनासाठी आवश्यक निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजंयती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत शासन नगर विकास विभागास सादर करणेबाबत आदेशित केलेले होते. तथापी शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाची मुदत माहे ऑगष्ट २०२४ मध्ये संपली असल्याने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नगरोत्थान महाभियान राबविण्याबाबत निर्णय क्र. नगरो-२०२३/प्र.क्र. ३८९/नवि-३३, दि.२२.०२.२०२४ रोजी शासन निर्णय घेतलेला आहे. शासनाच्या नगरोत्थान अभियानाअंतर्गत नागरी दळणवळण व भूसंपादनासाठी भूसंपादनासाठी सदर योजनेतून निधी शासनास्तरावरून उपलब्ध होईल.

नगरोत्थान महाअभियांनाअंतर्गत नागरी दळणवळणाकरीता व तद्अनुषंगीक कामाचे भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या एकूण निधीपैकी ५०% हिस्सा शासन स्तरावरून व उर्वरीत ५०% हिस्सा महानगरपालिका स्तरावरून खर्च करणे आवश्यक आहे. उक्त शासन निर्णयानूसार वमा. उच्च न्यायालयाचे दि. १३.१२.२०२३ रोजी पारित आदेशाच्या अनुषंगाने उक्त रस्ता रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधा विकासातंर्गत बांधीत जागा संपादनाकरीता लागणा-या एकूण खर्चापैकी महानगरपालिकेच्या ५०% हिस्स्याची तरतुद आहे.

मौजा- सिताबर्डी, रेल्वे स्टेशन लगत नागपूर- रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ विद्यमान २४.०० मी. रूंद विकास योजना रस्ता २५.०० मी. रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधा विकासाकरीता भूसंपादनास्तव सुमारे रू. ३१,३३,४४,४३८/- खर्च अपेक्षित असल्याने त्यापैकी महानगरपालिकेचा ५०% हिस्सा खर्च करणेस हमी देणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेकरीता प्रशासकीय ठराव पारित करणे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 129/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 12/02/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील

तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा- सिताबर्डी, न.भू.क्र. २४२२, २४०८, २४१०, २४०९, २४०७, २४०६, २४०४, २४०३, २४०२ येथील जागेच्या भूसंपादनाकरीता नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत निधी मागणीचा प्रस्ताव.

मौजा- सिताबर्डी रेल्वे स्टेशन लगत नागपूर - रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ विद्यमान २४.०० मी रूंद विकास रस्ता २५.०० मी. रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधेच्या विकासाकरीता भूसंपादन प्रकरणी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानातंर्गत निधी मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांच्यामार्फत पत्र क्र. मनपा/नरवि/२२७२, दि. ०९.०२.२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आलेल्या आहे. शासनास सादर करण्यात आलेला निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाअंतर्गत शासनाचा दि. ०४.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानूसार नमूद कार्यपध्दतीनूसार शासनास सादर करण्यात आलेला होता. तथापी, शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाची मुदत माहे ऑगष्ट २०२४ मध्ये संपत असल्याने या योजनेचे पुनरावलोकन करून राज्यातील वाढत्या नागरी भागाच्या गरजा विचारात घेऊन या योजनेअंतर्गत अ,ब व क वर्ग महापालिकांचा नव्याने समावेश करणे तसेच, योजनेच्या व्याप्तीमध्ये आणि वित्तीय आकृतीबंधात आवश्यक बदल करून ही योजना "नगरोत्थान महाभियान" या नावाने सूधारीत स्वरूपात राबविण्याकरीता शासनाने दि. २२.०२.२०२४ रोजी शासन निर्णय घेतलेला आहे. याकरीता शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधाच्या निर्मितीसाठी "नगरोत्थान महाभियान" योजना राबविण्यात शासन निर्णय घेतला असल्यामुळे सदर अभियानाअंतर्गत शासनास नागपूर रेल्वे स्टेशनजवळील रस्ता रूंदीकरण व तद्अनुषंगीक कामाकरीता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

याकरीता नगरोत्थान महाअभियांनाअंतर्गत शासनास निर्णयात नमूद कार्यपध्दतीनूसार विहीत मार्गाने शासनास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने दि. ०७.०२.२०२५ रोजीच्या पत्रानूसार विहीत मार्गाने प्राथाम्याने शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे. त्या दृष्टीने नागपूर रेल्वे स्टेशनजवळील रस्ता रूंदीकरण व तद्अनुषंगीक कामाकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

नागपूर शहरातील मौजा-सिताबर्डी येथील नागपूर –रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ रेल्वे स्टेशन लगत जयस्तंभ चौक ते मानस चौकापर्यंत विकास योजनेतील २४.०० मी रूंदीचा विकास योजना रस्त्याचे २५.०० मी रूंद करणेसह तद्नुषंगीक सुविधेचा विकास करणेचा प्रस्ताव असून सदर रस्ता राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ असून सदर रस्ता शहरातील मुख्य विकास योजना रस्ता आहे. सदर रस्ता रूंदीकरणामध्ये एकूण १२ शासकीय जागेचा समावेश असून या जागांमध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (MSRTC) व मध्यप्रदेश राज्य परिवहन महामंडळ (MPRTC) यांच्या मालकीच्या जागेंचा समावेश आहे. नगर भुमापन क्र. २४०३ ही जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या मालकीची असून सदर जागेचे क्षेत्र ४७६३.०० चौ.मी आहे. तसेच नगर भुमापन क्र. २४०४ नझुल/ मध्यप्रदेश राज्य परिवहन महामंडळ यांच्या मालकीची असून सदर जागेचे क्षेत्र २७४०.२० चौ.मी आहे. सदर दोन्ही जागांचे संपादनाखालील क्षेत्र ७५०३.२० चौ.मी. एवढे आहे. सदर

जागेचे संपादन नागपूर महानगरपालिकेस करावयाचे असल्याने सदर जागेचे संपादनकामी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून सुधारीत मुल्यनिर्धारण अपेक्षिले असता उक्त मालमत्ताच्या संपादनाकरीता नभुक्र.२४०३ या जागेचे मुल्यांकन रू. १९,४२,६४,७१६/- तसेच नभुक्र. २४०४ या जागेचे मुल्यांकन रू. ११,९०,७९,७२२/- असून दोन्ही जागांचे एकूण मुल्यांकन रू. ३१,३३,४४,४३८/- एवढे सुधारीत मुल्यनिर्धारण उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी नागपूर (शहर) यांनी नागपूर महानगरपालिकेस दि ३०.०१.२०२४ रोजी कळविलेले आहे. रेल्वे स्टेशनजवळील उड्डाणपुलाखालील विस्थापित होत असलेल्या गाळेधारकांनी मा. उच्च न्यायालयात रिटयाचिका क्र. ५६३३/२०२२ दाखल केली असता त्यामधील दि. १३.१२.२०२३ रोजी पारीत आदेशानूसार सदर विकास योजनेतील रस्ता रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधेच्या विकासाकरीता उक्त मालमत्ताच्या संपादनासाठी आवश्यक निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजंयती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत शासन नगर विकास विभागास सादर करणेबाबत आदेशित केलेले होते. तथापी शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाची मुदत माहे ऑगष्ट २०२४ मध्ये संपली असल्याने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नगरोत्थान महाभियान राबविण्याबाबत निर्णय क्र. नगरो-२०२३/प्र.क्र. ३८९/नवि-३३, दि.२२.०२.२०२४ रोजी शासन निर्णय घेतलेला आहे. शासनाच्या नगरोत्थान अभियानाअंतर्गत नागरी दळणवळण व भूसंपादनासाठी भूसंपादनासाठी सदर योजनेतून निधी शासनास्तरावरून उपलब्ध होईल.

नगरोत्थान महाअभियांनाअंतर्गत नागरी दळणवळणाकरीता व तद्अनुषंगीक कामाचे भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या एकूण निधीपैकी ५०% हिस्सा शासन स्तरावरून व उर्वरीत ५०% हिस्सा महानगरपालिका स्तरावरून खर्च करणे आवश्यक आहे. उक्त शासन निर्णयानूसार वमा. उच्च न्यायालयाचे दि. १३.१२.२०२३ रोजी पारित आदेशाच्या अनुषंगाने उक्त रस्ता रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधा विकासातंर्गत बांधीत जागा संपादनाकरीता लागणा-या एकूण खर्चापैकी महानगरपालिकेच्या ५०% हिस्स्याची तरतुद आहे.

मौजा- सिताबर्डी, रेल्वे स्टेशन लगत नागपूर- रायपूर राष्ट्रीय राजमार्ग क्र. ७ विद्यमान २४.०० मी. रूंद विकास योजना रस्ता २५.०० मी. रूंदीकरणासह तद्नुषंगीक सुविधा विकासाकरीता भूसंपादनास्तव सुमारे रू. ३१,३३,४४,४३८/- खर्च अपेक्षित असल्याने त्यापैकी महानगरपालिकेचा ५०% हिस्सा खर्च करणेस हमी देणेबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.